Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal
Online Available at www.cmrj.in
ISSN No.2456-1665

# परभणी जिल्हयातील ग्रामीण व नागरी लोकसंख्येचा तुलनात्मक अभ्यास

**प्राचार्य डॉ. एम.जी. राजपांगे**
नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) संचलित
कला व विज्ञान महाविद्यालय,
चौसाळा, ता. जि. बीड

**गायकवाड बालाजी कोंडीबा**
संशोधक विद्यार्थी
भूगोल विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

**प्रस्तावना :**

लोकसंख्या भूगोलात लोकसंख्येचे वितरण, लोकसंख्या वाढ, लोकसंख्या वाढीचे घटक, वयोगट, लिंगरचना, स्थलांतर, जन्मप्रमाण, मृत्युप्रमाण, लोकसंख्या वाढीच्या समस्या व त्यावरील उपाय या बरोबरच भाषा, धर्म, राहणीमानाचा दर्जा, व्यवसाय रचना, आर्थिक रचना अशा मानवांशी संबंधीत विविध गोष्टींचा अभ्यास केला जातो. लोकसंख्या ही कोणत्याही देशातील महत्वाची साधनसंपत्ती असते. त्या साधनसंपत्तीचा अभ्यास लोकसंख्या भूगोलाच्या माध्यमातुन केला जातो. जी. टी. त्रिवार्था यांना लोकसंख्या भूगोलाचे जनक असे म्हटले जाते. त्रिवार्था नंतर अनेक भूगोल तज्ञांनी लोकसंख्या भूगोलाचा विकास घडवून आणण्याचे कार्य केले. प्रस्तुत शोधनिबंधातुन परभणी जिल्हयातील ग्रामीण व नागरी लोकसंख्येचा तुलनात्मक अभ्यास केला आहे.

**अभ्यास क्षेत्र :–**

प्रस्तुत संशोधनामध्ये अभ्यास क्षेत्राचा अक्षयवृत्तीय विस्तार 18° 45′ उत्तर ते 20° 01′ उत्तर असून रेखवृत्तीय विस्तार 76° 13′ पूर्व ते 77° 26′ पूर्व असा आहे. अभ्यास क्षेत्राचे एकूण क्षेत्रफळ 6511 कि मी. आहे. अभ्यास क्षेत्राची एकूण लोकसंख्या 2011 च्या जनगणनेनुसार 1836086 इतकी असून ती महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या 1.63 टक्के आहे. अभ्यास क्षेत्रात प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने 9 तहसील अस्तित्वात आहेत. त्यामध्ये परभणी, गंगाखेड, पालम सोनपेठ, पूर्णा, पाथरी, मानवत, सेलू आणि जिंतूर यांचा समावेश होतो. .

**उद्दिष्टये :**

1) परभणी जिल्हयातील लोकसंख्या घनतेचा अभ्यास करणे.

2) परभणी जिल्हयातील लिंग–गुणोत्तराचा अभ्यास करणे.

3) परभणी जिल्हयातील साक्षरतेचा अभ्यास करणे.

4) ग्रामीण व नागरी लोकसंख्येचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**संकल्पना :–**

1) **लोकसंख्येची घनता :–** ही संकल्पना सर्व प्रथम इ.स. 1837 साली हेन्री–डयुरी–हर्नेस यांनी आयर्लंडमधील लोकसंख्येचे केंद्रीकरण माहित करून घेण्यासाठी दर चौरस मैलास किती लोक राहतात याचा अभ्यास केला होता. लोकसंख्येची घनता या संकल्पनेत एकूण लोकसंख्येची घनता या एकूण लोकसंख्या व एकूण भूभाग यांचे गुणोत्तर अपेक्षित असते. “1 चौ. किमी. किंवा चौरस मैल क्षेत्रफळ असलेल्या भूभागावर किती लोक राहतात हे दर्शविणाऱ्या लोकांच्या संख्येला लोकसंख्येची घनता असे म्हणतात.” लोकसंख्येची घनता खालील सुत्राद्वारे काढली जाते.

विशिष्ट प्रदेशातील एकूण लोकसंख्या
लोकसंख्येची घनता = -------------------------
त्याच विशिष्ट प्रदेशाचे क्षेत्रफळ

**लिंग–गुणोत्तर :–**

एकूण लोकसंखेतील स्त्री–पुरूष प्रमाण माहित करणे म्हणजे लिंग–गुणोत्तर होय. संयुक्त राष्ट्र संघटनेने (UNO) विविध देशातील लिंग–गुणोत्तर पुढील सुत्राच्या आधरे काढले आहे.

एखाद्या प्रदेशातील स्त्रियांची एकूण संख्या
स्त्री–पुरूष प्रमाण (लिंग–गुणोत्तर) = ----------------------------- x 1000
प्रदेशातील पुरूषांची एकूण संख्या

**लोकसंख्येची साक्षरता :–**

एखाद्याचे स्वतःच्या मातृभाषेत लिहिने व वाचण्याचे सामर्थ्य म्हणजे साक्षरता होय. भारतात जो मनुष्य समजून साधा संदेश कोणत्याही भाषेत लिहू व वाचू शकतो त्यास साक्षर मनुष्य म्हणतात. आंतरराष्ट्रीय रूढीनुसार साक्षर म्हणजे माणसाची कोणत्याही भाषेत किमान संदेश वाचण्याची व लिहण्याची क्षमता होय. साक्षरतेमुळे देशाचा आर्थिक विकास, सामाजिक उन्नती आणि लोकशाहीचे स्थायित्व यातून साधता येते. लोकसंख्येची साक्षरता ही खालील सुत्राद्वारे काढली जाते.

साक्षर व्यक्तिंची संख्या
साक्षरता = ----------------------------- x 100
एकूण लोकसंख्या

**सांख्यिकीय आणि संशोधन पद्धती :**

सन 1901 ते 2011 या दशकातील जनगणनेतील स्त्री–पुरूष प्रमाण, घनता, साक्षरता प्रमाणची आकडेवारी घेऊन तुलनात्मक बदल तपासण्यात आला. हा बदल ग्रामीण व नागरी विभागातून तपासण्यात आला. द्वितीयक स्वरूपातील आकडेवारीवरून आलेखाच्या सहाय्याने स्त्री–पुरूष प्रमाण, घनता, साक्षरता प्रमाण दर्शविण्यात आले आहे.

**विषय विवेचन : –**

**परभणी जिल्हयातील ग्रामीण व नागरी लिंग–गुणोत्तर प्रमाण**

2001 व 2011 या जनगणना अहवाला नुसार ग्रामीण व नागरी लिंग–गुणोत्तर तक्ता क्रमांक 1 मध्ये दर्शविले आहे

**तक्ता क्रमांक 1 . परभणी जिल्हयातील ग्रामीण व नागरी लिंग–गुणोत्तर प्रमाण (दर हजारी )**

| वर्ष | सर्वसाधारण | ग्रामीण | नागरी |
|---|---|---|---|
| 2001 | 958 | 968 | 937 |
| 2011 | 947 | 942 | 958 |

वरील तक्त्यात असे दिसून येते की, 2001 च्या जनगणनेप्रमाणे परभणी जिल्हयात लिंग–गुणोत्तर 958 इतके होते. त्यामध्ये ग्रामीण भागात 968 तर नागरी भागात 937 इतके होते. त्या तुलनेत 2011 च्या जनगणने नुसार लिंग–गुणोत्तर 947 इतके असून ग्रामीण भागात 942 तर नागरी भागात 958 इतके होते. 2001 च्या जनगणनेत ग्रामीण भागात नागरी भागाच्या तुलनेत स्त्रियांची संख्या जास्त आहे. तरी 2011 च्या जनगणनेनुसार ग्रामीण भागात नागरी भागाच्या तुलनेत स्त्रियांची संख्या कमी आहे परंतु दोन्ही जनगणनेनुसार दर हजार पुरूषंमागे स्त्रियांची संख्या कमी आहे.

2001 मध्ये ग्रामीण भागात स्त्रियांची संख्या 968 आहे. व 2011 मध्ये ग्रामीण भागात स्त्रियांची संख्या 942 इतकी आहे. म्हणजेच 2001 च्या तुलनेत 2011 मध्ये 26 स्त्रियांची संख्या कमी झाली. 2001 मध्ये नागरी भागात स्त्रियांची संख्या 937 आहे. व 2011 मध्ये नागरी भागात स्त्रियांची संख्या 958 इतकी आहे. म्हणजेच 2001 च्या तुलनेत 2011 मध्ये 21 स्त्रियांची वाढ झाली. असे 2001 च्या जनगणनेप्रमाणे ग्रामीण भागात 58 स्त्रियांची संख्या कमी आहे. नागरी भागात 42 स्त्रियांची कमी आहे.

**परभणी जिल्हयातील ग्रामीण व नागरी घनता :–**

मागील 2001 व 2011 या जनगणनेनुसार ग्रामीण व नागरी घनता तक्ता क्रमांक 2 मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक 2 .परभणी जिल्हयातील ग्रामीण व नागरी घनता**

| वर्ष | सर्वसाधारण | ग्रामीण | नागरी |
|---|---|---|---|
| 2001 | 246 | 165 | 4292 |
| 2011 | 295 | 204 | 5047 |

2001 मध्ये ग्रामीण भागात लोकसंख्येची घनता 161 असून नागरी भागात 4292 एवढी आहे. तर सर्वसाधारण घनता 246 आहे. तर 2011 मध्ये सर्वसाधारण घनता 295 इतकी आहे. म्हणजेच घनतेत 2011 मध्ये 130 वाढ झाली. 2011 मध्ये घनता ग्रामीण भागात 204 तर नागरी भागात 5047 आहे. म्हणजेच ग्रामीण व नागरी घनतेत वाढ झाली आहे.

2001 मध्ये ग्रामीण भागात 165 घनता असून नागरी भागात 4292 इतकी घनता आहे. म्हणजेच नागरी भागात घनतेचे प्रमाण जास्त आहे. 2011 मध्ये ग्रामीण भागात 204 घनता असून नागरी भागात 5047 इतकी घनता आहे. म्हणजेच नागरी भागात घनतेचे प्रमाण जास्त आहे. दोन्ही जनगणने मध्ये दोन्ही घनतेत वाढ झाल्याचे दिसून येते.

**परभणी जिल्हयातील ग्रामीण व नागरी साक्षरता :**

मागील 2001 व 2011 या जनगणना अहवालानुसार ग्रामीण व नागरी साक्षरता तक्ता क्रमांक 3 मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक 3 . परभणी जिल्हयातील ग्रामीण व नागरी साक्षरता दर (%)**

| वर्ष | सर्वसाधारण | ग्रामीण | नागरी |
|---|---|---|---|
| 2001 | 67.04 | 62.26 | 76.79 |
| 2011 | 73.34 | 70.28 | 80.08 |

वरील तक्त्यात असे दिसून येते की, 2001 मध्ये सर्वसाधारण साक्षरता दर 67.04% असून ग्रामीण भागात 62.26% तर नागरी भागात 76.79% इतका आहे. 2011 मध्ये सर्वसाधारण साक्षरता दर 73.34% असून ग्रामीण भागात 70.28% तर 80.08% इतका आहे. म्हणजेच 2001 च्या तुलनेत 2011 मध्ये सर्वसाधारण साक्षरता दरामध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. वरील आलेखा वरून असे दिसून येते की, 2001 च्या तुलनेत 2011 मध्ये ग्रामीण भागातील साक्षरता दर 8.02% ने वाढला असून सर्वसाधारण साक्षरता दरात 6.3% वाढ झाल्याचे दिसून येते. दोन्ही जनगणनेमध्ये ग्रामीण भागापेक्षा नागरी भागात साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. तर ग्रामीण भागात कमी आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे शिक्षणाबद्दलची अनास्था व शिक्षणाच्या अपुऱ्या सुविधा हेच होय.

**परभणी जिल्हयातील ग्रामीण व नागरी भागातील लोकसंख्येचे प्रमाण :–**

मागील 2001 व 2011 या जनगणना अहवालानुसार ग्रामीण व नागरी भागातील लोकसंख्येचे प्रमाण तक्ता क्रमांक 4 मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक 4. परभणी जिल्हयातील ग्रामीण व नागरी भागातील लोकसंख्येचे प्रमाण**

| वर्ष | एकूण लोकसंख्या | ग्रामीण लोकसंख्या | नागरी लोकसंख्या |
|---|---|---|---|
| 2001 | 1,527,715 | 1,042,529 | 485186 |
| 2011 | 1,836,086 | 1,266,280 | 569,806 |

**ग्रामीण व नागरी लोकसंख्या (%)**

| वर्ष | ग्रामीण लोकसंख्या | नागरी लोकसंख्या |
|---|---|---|
| 2001 | 68.24 | 31.75 |
| 2011 | 68.96 | 31.03 |

परभणी जिल्हयातील एकूण लोकसंख्येपैकी 2001 मध्ये 68.24% लोक ग्रामीण भागात राहतात तर 31.75% लोक नागरी भागात राहतात. 2011 मध्ये ग्रामीण भागात 68.96% लोक राहतात तर नागरी भागात 31.03% लोक राहतात म्हणजेच जास्तीत जास्त लोक आजही ग्रामीण भागात निवास करतात. 2001 मध्ये एकूण लोकसंख्येच्या 68.24% लोकसंख्या ग्रामीण भागात राहाते. तर नागरी भागात 31.75% लोकसंख्या राहते 2011 मध्ये ग्रामीण लोकसंख्येत 2001 च्या तुलनेत 0.72% ची वाढ झाली आहे.

**निष्कर्ष :**

1) 2011 मध्ये 2001 च्या तुलनेत ग्रामीण लोकसंख्येत 0.72% ची वाढ व नागरी लोकसंख्येत 0.72% ची घट झाली आहे.
2) दोन्ही जनगणनेमध्ये ग्रामीण भागापेक्षा नागरी भागात साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे.
3) दोन्ही जनगणनेमध्ये नागरी भागापेक्षा ग्रामीण भागात साक्षरता कमी आहे.
4) 2001 व 2011 च्या जनगणनेत ग्रामीण भागापेक्षा नागरी भागात घनतेचे प्रमाण जास्त दिसून येते.
5) 2001 च्या तुलनेत 2011 मध्ये ग्रामीण व नागरी घनते मध्ये वाढ झाल्याचे दिसून येते.
6) 2001 च्या तुलनेत 2011 मध्ये ग्रामीण लिंग–गुणोत्तरात घट झाली आहे. तर नागरी लिंग–गुणोत्तरात वाढ झाली आहे.
7) 2001 मध्ये ग्रामीण पेक्षा नागरी भागात लिंग–गुणोत्तरात प्रमाण कमी दिसून येते.
8) 2011 मध्ये नागरी भागात लिंग–गुणोत्तर ग्रामीण पेक्षा जास्त येते.
9) सर्वसाधारणपणे 2001 मध्ये लिंग–गुणोत्तर 958 इतके होते. तर 2011 मध्ये 947 इतके आहे म्हणजेच 2001 च्या तुलनेत 2011 मध्ये 11 स्त्रियांची घट झाली परंतु एकूण लोकसंख्येत दर हजारी स्त्रियांची संख्या कमी असल्याचे दिसून येते.

**संदर्भः–**

1) सवदी सर ए.बी., महाराष्ट्राचा भूगोल, निराली प्रकाशन, पूणे. अमूलाग्र बदललेली सुधारीत तिसरी आवृत्ती–2012.
2) सारंग .प्रा.डॉ. सुभाषचंद्र, मानवी भूविज्ञान, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती–1997.
3) खतीब प्रा. के.ए., लोकसंख्या भूगोल, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती–2011.
4) District Census Handbook Parbhani, Census of India 2011 Maharashtra. Directorate of Census Operations, Maharashtra.
5) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, 2011 जिल्हा परभणी, अर्थ व सांख्यिकी संचालनालय महाराष्ट्र शासन, मुंबई.
6) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, 2017 जिल्हा परभणी, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, प्रशासकीय इमारत परभणी.
8) सवदी सर ए.बी.,सवदीज महाराष्ट्राचा प्रगत ॲटलास एक सांख्यिकीय विश्लेषण, निराली प्रकाशन, पूणे. द्वितीय आवृत्ती–2015
9) 2001 व 2011 महाराष्ट्र व भारत जनगणना अहवाल.